Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

वेक कान बाप्पा!

। सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६ । वर्ष १ । अंक १५६ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

DIGITAL EDITION

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभर 'सेवा संकल्प अभियान' घोषणा

21 राज्यांत समान नागरी कायदा लागू करणार!

कलम 370, तीन तलाक आणि राष्ट्रीय सुरक्षेतील निर्णयांचा गृहमंत्र्यांकडून उल्लेख : शाह

जन सम्राट टाईम्स

मुंबई। भाजप-एनडीएशासित 21 राज्यांमध्ये 2029 पूर्वी समान नागरी कायद्याची (UCC) अंमलबजावणी करण्याचा निर्धार केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी व्यक्त केला. मुंबई दौऱ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी ही मोठी घोषणा केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभर 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. या अभियानाच्या माध्यमातून विविध विकासकामे हाती घेण्याबरोबरच केंद्र व राज्य सरकारने केलेल्या विकासकामांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. अमित शाह म्हणाले, "कलम 370 आणि कलम 35 अ हटविणे अशक्य मानले जात होते. मात्र रक्ताचा एक थेंबही न सांडता आणि एकही गोळी न चालवता कलम 370 हटविण्यात आले. आज ते इतिहासाचा भाग झाले आहे आणि जम्मू-काश्मीर पूर्णपणे भारतासोबत जोडले गेले आहे." मुस्लिम महिलांना समान अधिकार मिळवून देण्याच्या दिशेने सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलल्याचे सांगितले. अनेक राज्यांमध्ये समान नागरी कायद्याची प्रक्रिया सुरू असल्याचे नमूद करत त्यांनी 2029 पूर्वी भाजप-एनडीएशासित 21 राज्यांमध्ये त्याची अंमलबजावणी करण्याचा विश्वास व्यक्त केला. राष्ट्रीय सुरक्षेबाबत बोलताना शाह यांनी नक्षलवादाविरोधातील कारवाई, ईशान्य भारतातील शांतता करार आणि दहशतवादाविरोधातील विविध लष्करी कारवायांचा उल्लेख केला. देशाच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत सरकारने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.'सेवा संकल्प अभियान'तून जनतेशी थेट संवाद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शासनाच्या प्रमुख पदांवर 25 वर्षांची कारकीर्द पूर्ण केल्याच्या निमित्ताने 'सेवा संकल्प अभियान' राबविण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. फडणवीस म्हणाले की, मोदी यांच्या राजकीय कारकिर्दीत सेवाभाव हा कायम केंद्रस्थानी राहिला आहे. राजकारणापेक्षा सेवाकारण आणि गरीब कल्याणाला त्यांनी सातत्याने प्राधान्य दिले. त्यामुळे या अभियानाच्या माध्यमातून सरकार आणि पक्ष जनतेमध्ये जाऊन विविध सेवाभावी उपक्रम राबविणार आहेत. महाराष्ट्र शासनानेही 'सेवा संकल्प अभियानाच्या' निमित्ताने विविध कार्यक्रमांचे नियोजन केले असून, या उपक्रमांच्या माध्यमातून सामान्य नागरिकांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.



ईशान्य भारतातील शांतता करार

"कलम 370 आणि कलम 35 अ हटविणे अशक्य मानले जात होते. मात्र रक्ताचा एक थेंबही न सांडता आणि एकही गोळी न चालवता कलम 370 हटविण्यात आले. आज ते इतिहासाचा भाग झाले आहे आणि जम्मू-काश्मीर पूर्णपणे भारतासोबत जोडले गेले आहे." मुस्लिम महिलांना समान अधिकार मिळवून देण्याच्या दिशेने सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलल्याचे सांगितले. अनेक राज्यांमध्ये समान नागरी कायद्याची प्रक्रिया सुरू असल्याचे नमूद करत त्यांनी 2029 पूर्वी भाजप-एनडीएशासित 21 राज्यांमध्ये त्याची अंमलबजावणी करण्याचा विश्वास व्यक्त केला. राष्ट्रीय सुरक्षेबाबत बोलताना शाह यांनी नक्षलवादाविरोधातील कारवाई, ईशान्य भारतातील शांतता करार आणि दहशतवादाविरोधातील विविध लष्करी कारवायांचा उल्लेख केला.

दैनिक जन सम्राट टाईम्स

गणेश चतुर्थीनिमित्त सोमवार दिनांक 14 सप्टेंबर 2026 रोजी दैनिक जन सम्राट टाईम्सच्या कार्यालयास सुट्टी असल्याने मंगळवार, दिनांक 15 सप्टेंबरचा अंक प्रसिद्ध होणार नाही.

-मुख्य संपादक

Selected

नवरात्रोत्सवात अहिल्यानगर जिल्ह्यात डॉल्बी बंदी

अहिल्यानगर : जिल्ह्यात गणेशोत्सव व नवरात्रोत्सवाच्या कालावधीत डॉल्बी साउंड सिस्टिम व उच्च आवाजाच्या ध्वनीवर्धकांच्या वापरास आज, सोमवारपासून प्रतिबंध घालण्यात आल्याचा आदेश अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी दादासाहेब गीते यांनी काढले आहेत. दि. १४ ते २५ सप्टेंबर दरम्यानच्या गणेशोत्सवात तसेच ११ ते २० ऑक्टोबर या नवरात्रोत्सव कालावधीसाठी ही बंदी घालण्यात आली आहे.

एसटीच्या सेवेत 'टाटा मोटर्स'च्या पाच हजार बसेस दाखल होणार, निविदा प्रक्रिया पूर्ण

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सेवेत लवकरच टाटा मोटर्सच्या पाच हजार बसेस दाखल होणार आहेत. या बस खरेदीची निविदा प्रक्रिया पार पडली असल्याची माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. नव्या बसेसच्या माध्यमातून एसटीची सेवा अधिक सक्षम करण्याचा संकल्प करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. या निविदा प्रक्रियेत सर्वांत कमी दराचा देकार टाटा मोटर्ससारख्या नामांकित आणि विश्वासार्ह संस्थेने सादर केला आहे. त्यामुळे बसेसच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा विश्वास मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला. नव्या पाच हजार ' बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल झाल्यानंतर ग्रामीण महाराष्ट्राची 'लोकवाहिनी' असलेल्या एसटीला मोठी बळकटी मिळणार आहे. नव्या बसेसमुळे जुन्या बसेसवरील ताण कमी होईल, बसफेऱ्यांची उपलब्धता वाढविणे शक्य होईल आणि प्रवाशांना अधिक चांगली सेवा देता येईल. जुन्या व गळक्या बसेस तसेच प्रवासादरम्यान बसेस बंद पडण्याच्या समस्येवरही नव्या ताफ्यामुळे प्रभावीपणे मात करता येणार आहे.पुढील सहा महिन्यांत सुमारे पाच हजार हून अधिक जुन्या बसेस प्रवासी सेवेतून कालबाह्य होणार आहेत. एसटी महामंडळाने यापूर्वीच बसताफ्याच्या आधुनिकीकरणाला सुरुवात केली आहे. २ – २ आसन व्यवस्थेच्या २६४० बसेस ताफ्यात दाखल झाल्या आहेत. त्याचबरोबर ३ बाय २ आसन व्यवस्थेच्या तीन हजार 'राजमाता जिजाऊ' बसेस ताफ्यात दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. नव्या बसेसच्या समावेशामुळे एसटीचा ताफा अधिक तरुण, सक्षम आणि प्रवाशांच्या गरजांशी सुसंगत होत आहे. नव्या पाच हजार बसेस ताफ्यात दाखल झाल्यानंतर 'मागेल त्याला बसफेरी' उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. बसफेरीचा फायदा झाला नाही तरी चालेल; मात्र बसफेरीची मागणी करणाऱ्यांनी ती फेरी तोट्यात चालणार नाही, याची हमी घ्यावी, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सेवेत लवकरच टाटा मोटर्सच्या पाच हजार बसेस दाखल होणार आहेत. या बस खरेदीची निविदा प्रक्रिया पार पडली असल्याची माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. नव्या बसेसच्या माध्यमातून एसटीची सेवा अधिक सक्षम करण्याचा संकल्प करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. या निविदा प्रक्रियेत सर्वांत कमी दराचा देकार टाटा मोटर्ससारख्या नामांकित आणि विश्वासार्ह संस्थेने सादर केला आहे.

त्यामुळे बसेसच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा विश्वास मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला. नव्या पाच हजार ' बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल झाल्यानंतर ग्रामीण महाराष्ट्राची 'लोकवाहिनी' असलेल्या एसटीला मोठी बळकटी मिळणार आहे. नव्या बसेसमुळे जुन्या बसेसवरील ताण कमी होईल, बसफेऱ्यांची उपलब्धता वाढविणे शक्य होईल आणि प्रवाशांना अधिक चांगली सेवा देता येईल. जुन्या व गळक्या बसेस तसेच प्रवासादरम्यान बसेस बंद पडण्याच्या समस्येवरही नव्या ताफ्यामुळे प्रभावीपणे मात करता येणार आहे.पुढील सहा महिन्यांत सुमारे पाच हजार हून अधिक जुन्या बसेस प्रवासी सेवेतून कालबाह्य होणार आहेत. एसटी महामंडळाने यापूर्वीच बसताफ्याच्या आधुनिकीकरणाला सुरुवात केली आहे. ताफ्यात दाखल झाल्या आहेत. त्याचबरोबर ३ बाय २ आसन व्यवस्थेच्या तीन हजार 'राजमाता जिजाऊ' बसेस ताफ्यात दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.



मुंबई पोलिसांनी मनोज जरांगेंच्या आंदोलनाला कुठली सात कारणं देत संमती नाकारली?

जन सम्राट टाईम्स

मुंबई | प्रतिनिधी: मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी आणि सरकारने यापूर्वी दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी करण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा मुंबईच्या दिशेने कूच करण्याचे जाहीर केले आहे. १५ सप्टेंबर रोजी मनोज जरांगे अंतरवली सराटीतून मुंबईकडे निघणार असून १९ सप्टेंबरपासून आझाद मैदानावर बेमुदत उपोषणाला बसणार आहेत. मात्र, मुंबई पोलिसांनी त्यांच्या या उपोषणाला परवानगी नाकारली आहे.जाहीर सभा, आंदोलने व मिरवणुका नियम २०२५ चा नियम भंग करणार असल्याची खात्री आहे, असं म्हणत मुंबई पोलिसांनी मनोज जरांगे पाटलांना आंदोलनासाठी परवानगी नाकारली. दरम्यान, दोनच दिवसांपूर्वी मनोज जरांगेंना मुंबईत येण्यापासून रोखू शकत नाही असा निर्णय उच्च न्यायालयानं दिला होता. त्यामुळे सरकार न्यायदेवतेचा अपमान करत आहे, नाकारण्याची कारणं दिली आहेत.एका आंदोलनास एका वेळी फक्त एकच दिवसासाठी (सकाळी ९ ते संध्याकाळी ६) परवानगी दिली जाते. शनिवार, रविवार व शासकीय सुट्टीच्या दिवशी परवानगी नसते. जरांगेंनी शनिवार (१९ सप्टेंबर) पासून पुढे मागण्या मान्य होईपर्यंत अनिश्चित कालावधीसाठी उपोषणाची मागणी केली आहे, हे नियमांचे उल्लंघन आहे. पोलिसांनी वाहतूक कोंडीचंही कारण दिलं आहे. आंदोलनामुळे वाहतूक विस्कळीत होण्याची शक्यता आहे. मनोज जरांगेंनी "गाड्या लाखात आहेत" असे वक्तव्य अंतरवाली सराटीमध्ये केलं होतं. गेल्या वर्षी सुमारे ५ हजार वाहनं दक्षिण मुंबईतील मुख्य रस्त्यांवर अनधिकृतपणे उभी करून रस्ता रोको केला गेला. यंदाही तशीच शक्यता असल्याने सार्वजनिक वाहतूक व्यवस्था विस्कळीत होण्याचा धोका आहे.

एकनाथ शिंदेंनी घेतली अमित शाहांची भेट; अर्धा तास चर्चा

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या दोन दिवसीय मुंबई दौऱ्यादरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे त्यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांमध्ये सुमारे अर्धा तास चर्चा झाल्याची माहिती आहे. मात्र, या भेटीत नेमक्या कोणत्या राजकीय किंवा प्रशासकीय विषयांवर चर्चा झाली, याचा अधिकृत तपशील अद्याप समोर आलेला नाही. अमित शाह मुंबई दौऱ्यावर असताना एकनाथ शिंदे यांनी सह्याद्री अतिथीगृहात त्यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी शिंदे यांनी पुष्पगुच्छ देऊन अमित शाह यांचे स्वागत केले. या भेटीची माहिती शिंदे यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वरील पोस्टद्वारे दिली. "केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमितभाई शाह हे दोन दिवसीय मुंबई दौऱ्यावर आले आहेत. यानिमित्ताने आज मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे त्यांची सदिच्छा भेट घेत पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले," असे शिंदे यांनी पोस्टमध्ये नमूद केले. दरम्यान, सह्याद्री अतिथीगृहातील भेटीनंतर अमित शाह आणि एकनाथ शिंदे यांनी एशियाटिक सोसायटीच्या कार्यक्रमासाठी एकाच वाहनातून प्रवास केल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या भेटीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

विशेष म्हणजे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे थेट कार्यक्रमस्थळी पोहोचले. अमित शाह यांच्या मुंबई दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आला असताना शाह आणि शिंदे यांच्यात झालेल्या या चर्चेमुळे विविध राजकीय तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. मात्र, भेटीतील चर्चेचा अधिकृत अजेंडा स्पष्ट झालेला नाही. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या दोन दिवसीय मुंबई दौऱ्यादरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे त्यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांमध्ये सुमारे अर्धा तास चर्चा झाल्याची माहिती आहे. मात्र, या भेटीत नेमक्या कोणत्या राजकीय किंवा प्रशासकीय विषयांवर चर्चा झाली, याचा अधिकृत तपशील अद्याप समोर आलेला नाही.



जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

भारतीय महिला संघाने आशिया चषक जेतेपदावर आठव्यांदा केला कब्जा

महिला संघानंही पाकिस्तानच्या मोहसीन नक्वींकडून आशिया कप का स्वीकारला नाही?

जन सम्राट टाईम्स

मुंबई|प्रतिनिधी: वर्ल्डकपविजेत्या भारतीय महिला संघाने आशियाई उपखंडातही अव्वल असल्याचं सिद्ध करत आशिया चषक स्पर्धेच्या जेतेपदावर नाव कोरलं. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वात आणि अमोल मुझुमदार यांच्या मार्गदर्शनात भारतीय संघाने आठव्यांदा महिला आशिया चषकाच्या जेतेपदाची कमाई केली. स्मृती मानधना आणि शफाली वर्मा यांची तडाखेबंद शतकी भागीदारी या विजयाचं वैशिष्ट्य ठरलं. भारताने २००४, २००५-०६, २००६, २००८, २०१२, २०१६, २०२२ मध्ये या स्पर्धेचं जेतेपद पटकावलं होतं. हरमनप्रीत कौरने फायनलच्या मुकाबल्यात टॉस जिंकून बॅटिंगचा निर्णय घेतला. दुबईच्या फलंदाजीला पोषक खेळपट्टीवर स्मृती मानधना आणि शफाली वर्मा यांनी १२९ धावांची तडाखेबंद भागीदारी केली. या भागीदारीने मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. शफाली ३९ चेंडूत ९ चौकार आणि २ षटकारांसह ६८ धावा करून बाद झाली. थोड्याच वेळात चोरटी धाव घेण्याच्या प्रयत्नात स्मृती बाद झाली. तिने ३९ चेंडूत ५ चौकार आणि ३ षटकारांसह ५९ धावांची खेळी केली. यानंतर हरमनप्रीत (१४), ऋचा घोष (१७) आणि कमालिनी (१५) यांनी छोट्या पण उपयुक्त खेळी केल्या. भारतीय संघाने १८३ धावांची मजल मारली. प्रत्युत्तरादाखल खेळताना इमेशा दुलानी झटपट बाद झाली. यानंतर चामरी अट्टापटू आणि विश्मी गुणरत्ने यांनी डाव सावरला. दीप्ती शर्माने एका षटकात दोघींना बाद करत श्रीलंकेला अडचणीत टाकलं. ही जोडी फुटल्यानंतर श्रीलंकेने नियमित अंतरात विकेट्स गमावल्या. श्री चरणीने २० धावांच्या मोबदल्यात ४ विकेट्स घेत श्रीलंकेच्या फलंदाजांना स्थिरावू दिलं नाही. दीप्ती शर्माने ३ विकेट्स घेतल्या.शफालीने स्पर्धेत २३६ तर स्मृतीने २१३ धावा करत जेतेपदात मोलाचा वाटा उचलला. भारतीय संघ आता जपान इथे होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी रवाना होणार आहे. त्या स्पर्धेतही भारतीय संघ जेतेपदाचा दावेदार आहे.अंतिम मुकाबला आटोपल्यानंतर तब्बल पाऊण तासाने पुरस्कार वितरण सोहळा सुरू झाला. श्रीलंकेचा माजी अष्टपैलू खेळाडू परवेझ महारुफ पुरस्कार सोहळ्याचं सूत्रसंचालन करत होते. पुरस्कार सोहळ्याला यजमान दुबई अर्थात युएई बोर्डाचे पदाधिकारी उपस्थित होते. आशियाई क्रिकेट परिषदेचे प्रमुख नक्वी उपस्थित असल्याने भारतीय संघ जेतेपद त्यांच्या हस्ते स्वीकारणार का याविषयी उलटसुलट चर्चा सुरू होत्या. उपविजेत्या श्रीलंका संघाला सन्मानित करण्यात आलं. याव्यतिरिक्त फायनलसाठी कार्यरत सामनाधिकारी, पंचांनाही गौरवण्यात आलं. मात्र विजेत्या भारतीय संघाला पदक देऊन तसंच जेतेपदाच्या करंडकासह गौरवण्यात आलं नाही. श्रीलंका संघ आणि पंच-सामनाधिकारी यांना सन्मानित करण्यात आल्यानंतर महारुफ यांनी पुरस्कार सोहळा संपल्याचं जाहीर केलं. सामन्यासाठी तज्ज्ञ म्हणून स्टुडिओत भारताच्या माजी कर्णधार मिताली राज आणि अंजुम चोप्रा उपस्थित होत्या. मात्र त्यांनीही यासंदर्भात भाष्य केलं नाही.भारतीय संघव्यवस्थापनाने नक्वी यांच्या हस्ते जेतेपद स्वीकारणार नाही अशी भूमिका घेतली का? याविषयी कोणीही अधिकृत पातळीवर भाष्य केलं नाही. या सामन्याला बीसीसीआयचे सचिव देवजीत साईकिया तसंच उपाध्यक्ष राजीव शुक्ला उपस्थित होते. सामना संपल्यानंतर साईकिया यांनी नंदनी शर्माला पदकाने सन्मानित केलं. मात्र हे पदक कशासाठी याचीही माहिती देण्यात आली नाही. पुरस्कार वितरण सोहळ्यावेळी भारतीय संघ व्यासपीठाच्या आसपासही नव्हता अशी माहिती समोर येते आहे. सामन्यादरम्यान नक्वी यांनी देवजीत साईकिया आणि राजीव शुक्ला यांच्याशी संवाद साधला होता.



जात पडताळणी माध्यमातून कुणबी संपण्याचे षडयंत्र!

जन सम्राट टाईम्स

मुंबई | प्रतिनिधी: हैदराबाद गॅझेटच्या आधारावर कुणबी जात प्रमाणपत्र देण्यासाठी राज्य सरकारने मराठवाड्यात शिबिरे घेतली. दुसरीकडे कोकणातील कुणब्यां'ची प्रमाणपत्रे सक्षम अधिकाऱ्याने दिली नसल्याचे सांगत बाद केली जात असून पालघर, मुंबई, रायगड, रत्नागिरी या जिल्ह्यांतील कुणब्यांची ओळख संपवण्याचे यामागे राजकीय षडयंत्र आहे, असा आरोप शिक्षक भारतीचे माजी आमदार कपिल पाटील यांनी केला आहे.

यासंदर्भात पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहले आहे. ठाकरे शिवसेनेच्या विशाखा राऊत यांचे इतर मागास वर्गीय प्रमाणपत्र पडताळणीमध्ये बाद ठरले आहे. त्यामुळे त्यांचे नगरसेवक पद रद्द करण्यात आले आहे. राऊत यांच्या प्रमाणपत्रावर शिंदे शिवसेनेकडून आक्षेप घेण्यात आला होता. दादरच्या ओबीसी प्रभागातून निवडून आलेल्या विशाखा मोरेश्वर राऊळ (राऊत) यांचे कुणबी जात प्रमाणपत्र पालघरच्या जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने रद्द केले आहे.

राऊत मुंबईच्या माजी महापौर आहेत. त्या कुणबी असून वाढवण बंदराच्या टाचेखाली जी गावे जाणार आहेत, तिथल्या माझ्या गावच्या आहेत.पालघरमधले वाडवळ, भंडारी, कुणबी (चोखार), वंजारी हे वसई आणि मुंबईतही आहेत. ते मुंबईत आलेत म्हणून ते पालघरचे रहिवासी नव्हेत हा विपर्यास झाला. अशा पद्धतीने निमअस्पृश्यतेचे चटके सोसलेला कोकण कुणबी समाज संकटात आहे. इतर मागास वर्गीय गटांचे उच्छेदन आपण जात पडताळणीव्दारे होऊ देणार आहेत का ? हा प्रश्न पाटील यांनी आपल्या पत्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केला आहे. कोकणी किंवा तिलोरी कुणबी महाराष्ट्रातील अन्य भागातील कुणबी आणि कुणबी मराठा यांच्यापेक्षा स्वतंत्र जात आहे.

भुसावळ येथे गुर्जर सम्राट श्री मिहीर भोज जयंती उत्साहात, समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती!

प्रतिमापूजनासह विविध उपक्रमांनी रंगला जयंती सोहळा

जन सम्राट टाईम्स



भुसावळ प्रतिनिधी : यावल रोडवरील सूर्यमुखी हनुमान मंदिर व सेंट लायसेस शाळा परिसरात गुर्जर सम्राट श्री मिहीर भोज राजा यांची जयंती उत्साहपूर्ण व चैतन्यमय वातावरणात साजरी करण्यात आली. या सोहळ्यास गुर्जर समाजबांधवांसह परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून कॅबिनेट मंत्री ना. गुलाबरावजी पाटील यांचे स्वीय सहाय्यक नवलसिंग राजे पाटील, कंडारीचे माजी सरपंच डॉ. सूर्यभान पाटील, दोडे गुर्जर समाजाचे अध्यक्ष संजय पाटील यांच्यासह सहसंचालक मंडळाचे पदाधिकारी व समाजबांधव उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, प्रतिमापूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. नवलसिंग राजे पाटील आणि डॉ. सूर्यभान पाटील यांच्या हस्ते गुर्जर सम्राट श्री मिहीर भोज यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी चव्हाण सर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना राजा मिहीर भोज यांच्या जीवनकार्यावर, शौर्यावर आणि ऐतिहासिक योगदानावर प्रकाश टाकला. त्यांच्या कार्यातून समाजाने प्रेरणा घेऊन एकजूट, सामाजिक बांधिलकी आणि संस्कृतीचे जतन करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. जयंती सोहळ्यानिमित्त नवलसिंग राजे पाटील यांच्या हस्ते उपस्थित समाजबांधवांना गुर्जर सम्राट राजा मिहीर भोज यांची प्रतिमा भेट देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन उत्स्फूर्तपणे पार पडले. समाजबांधवांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. सामाजिक एकोपा आणि पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडविणारा हा जयंती सोहळा सलोख्याच्या वातावरणात उत्साहात संपन्न झाला. यावल रोडवरील सूर्यमुखी हनुमान मंदिर व सेंट लायसेस शाळा परिसरात गुर्जर सम्राट श्री मिहीर भोज राजा यांची जयंती उत्साहपूर्ण व चैतन्यमय वातावरणात साजरी करण्यात आली. या सोहळ्यास गुर्जर समाजबांधवांसह परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून कॅबिनेट मंत्री ना. गुलाबरावजी पाटील यांचे स्वीय सहाय्यक नवलसिंग राजे पाटील, कंडारीचे माजी सरपंच डॉ. सूर्यभान पाटील, दोडे गुर्जर समाजाचे अध्यक्ष संजय पाटील यांच्यासह सहसंचालक मंडळाचे पदाधिकारी व समाजबांधव उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

आरएमसी' प्रकल्पांना कारवाईचा दणका!



जन सम्राट टाईम्स

पुणे | प्रतिनिधी : गृहनिर्माण क्षेत्राचा वेगाने विस्तार होत असताना रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) प्रकल्पांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या प्रकल्पांमुळे मोठ्या प्रमाणात हवा प्रदूषण होत असल्याच्या तक्रारी वाढल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने गेल्या वर्षी त्यांच्यासाठी नवीन नियमावली लागू केली. या नवीन नियमावलीचे पालन न करणाऱ्या प्रकल्पांवर मंडळाने आता थेट कारवाईचा बडगा उगारला आहे. मंडळाकडून पुण्यासह सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांत २१ 'आरएमसी' प्रकल्प बंद करण्यात आले आहेत. यापुढील काळातही ही धडक कारवाई सुरु राहणार आहे. 'आरएमसी' प्रकल्पांमुळे होत असलेल्या हवा प्रदूषणाचा मुद्दा वारंवार उपस्थित होत आहे. काही ठिकाणी नागरिकांनी रस्त्यावर उतरून 'आरएमसी' प्रकल्पांविरोधात आंदोलन केल्याने त्याची तीव्रता समोर आली. यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने 'आरएमसी' प्रकल्पांसाठी नवीन नियमावली गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये लागू केली. मात्र, या नियमावलीच्या अंमलबजावणीत 'आरएमसी' प्रकल्पांना स्थानिक स्वराज्य संस्थांकडून सहकार्य मिळत नव्हते. त्याच्यामुळे ही अंमलबजावणी लांबणीवर पडली होती. अखेर हा तिढा सुटल्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने 'आरएमसी' प्रकल्पांना नवीन निमयावलीचे पालन करण्याच्या सूचना केल्या. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने 'आरएमसी' प्रकल्पांकडून नवीन नियमावलीचे पालन होते की नाही, हे तपासण्याची मोहीम जानेवारी महिन्यापासून सुरू केली. मंडळाने पुणे, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यात ही मोहीम राबविली. यात एकूण २१ 'आरएमसी' प्रकल्पांकडून नियमभंग झाल्याचे समोर आले. त्यानंतर या प्रकल्पांना नियमांचे पालन करण्यास मुदत देऊनही त्यांनी हे करण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे मंडळाने अखेर हे 'आरएमसी' प्रकल्प बंद करण्याचे पाऊल उचलले.महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने 'आरएमसी' प्रकल्प बंद करण्याची कारवाई करूनही ते सुरूच राहत असल्याचे प्रकार घडत आहेत. काही प्रकल्पांचा वीजपुरवठा बंद करण्यात आल्यानंतर ते जनित्रावर सुरू ठेवले जातात. याच वेळी पाणीपुरवठा बंद करण्यात आलेल्या प्रकल्पांकडून टँकरचे पाणी वापरण्याची पळवाट शोधली जाते.

घाटनांद्रा–तिडका रस्त्याची दुरवस्था; एस.टी. बससेवा बंद

जड वाहतुकीमुळे रस्ता उखडला; विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान

जन सम्राट टाईम्स



सोयगाव| प्रतिनिधी : सिल्लोड तालुक्यातील घाटनांद्रा ते सोयगाव तालुक्यातील तिडका या मार्गाची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, रस्ता खराब झाल्याने या मार्गावरील एस.टी. बससेवा बंद झाली आहे. परिणामी विद्यार्थी, शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने तातडीने रस्त्याची दुरुस्ती करून बससेवा पूर्ववत करण्याची मागणी ग्रामपंचायत सदस्य शेख नसरीन शेख रईस यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनानुसार, जंगली कोटा मार्गे फर्दापूर ते नागद परिसरातील कामासाठी K.T.I.L. कंपनीच्या कंत्राटदारांकडून बोरमाळा तांडा परिसरातून खडी व मुरूम वाहतूक केली जात आहे. या कामासाठी मोठ्या प्रमाणावर जड वाहनांची ये-जा सुरू असल्याने घाटनांद्रा ते तिडका रस्ता पूर्णपणे उखडला आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या मार्गावरून दररोज परिसरातील विद्यार्थी शाळा-महाविद्यालयांसाठी, तर शेतकरी व कामगार विविध कामांसाठी प्रवास करतात. मात्र रस्त्याची दुरवस्था झाल्याने प्रवास धोकादायक बनला आहे. विशेषतः पावसाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर झाली असून, अपघाताचा धोका वाढला आहे. घाटनांद्रा–तिडका मार्गाची अवस्था खराब झाल्याने या मार्गावरून पाचोरा, छत्रपती संभाजीनगर, सिल्लोड आणि सोयगावकडे ये-जा करणारी एस.टी. बससेवाही बंद झाली आहे. बससेवा बंद असल्याने विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयात पोहोचण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. अनेक विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा थेट परिणाम होत असून, पालकांमध्येही चिंता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे संबंधित K.T.I.L. कंपनीच्या कंत्राटदारांना आवश्यक आदेश देऊन घाटनांद्रा ते तिडका रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, संपूर्ण रस्त्याचे डांबरीकरण करावे आणि या मार्गावरील एस.टी. बससेवा त्वरित पूर्ववत करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. दरम्यान, रस्त्याची दुरुस्ती तातडीने न झाल्यास नागरिकांच्या वतीने लोकशाही मार्गाने संबंधित तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. सिल्लोड तालुक्यातील घाटनांद्रा ते सोयगाव तालुक्यातील तिडका या मार्गाची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, रस्ता खराब झाल्याने या मार्गावरील एस.टी. बससेवा बंद झाली आहे. परिणामी विद्यार्थी, शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने तातडीने रस्त्याची दुरुस्ती करून बससेवा पूर्ववत करण्याची मागणी ग्रामपंचायत सदस्य शेख नसरीन शेख रईस यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनानुसार, जंगली कोटा मार्गे फर्दापूर ते नागद परिसरातील कामासाठी K.T.I.L. कंपनीच्या कंत्राटदारांकडून बोरमाळा तांडा परिसरातून खडी व मुरूम वाहतूक केली जात आहे. या कामासाठी मोठ्या प्रमाणावर जड वाहनांची ये-जा सुरू असल्याने घाटनांद्रा ते तिडका रस्ता पूर्णपणे उखडला आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या मार्गावरून दररोज परिसरातील विद्यार्थी शाळा-महाविद्यालयांसाठी, तर शेतकरी व कामगार विविध कामांसाठी प्रवास करतात. मात्र रस्त्याची दुरवस्था झाल्याने प्रवास धोकादायक बनला आहे. विशेषतः पावसाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर झाली असून, अपघाताचा धोका वाढला आहे. घाटनांद्रा–तिडका मार्गाची अवस्था खराब झाल्याने या मार्गावरून पाचोरा, छत्रपती संभाजीनगर, सिल्लोड आणि सोयगावकडे ये-जा करणारी एस.टी. बससेवाही बंद झाली आहे.

धरणगावात ग्रामीण व्हिडिओग्राफी कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद!



जन सम्राट टाईम्स

धरणगाव| प्रतिनिधी : धरणगाव तालुका ग्रामीण फोटोग्राफर असोसिएशन, पिंप्री खुर्द यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या फोटोग्राफी व व्हिडिओग्राफी कार्यशाळेला छायाचित्रकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अमळनेर, धुळे, शिरपूर, शिंदखेडा, चोपडा, यावल, बऱ्हाणपूर, रावेर, मुक्ताईनगर, धरणगाव, जळगाव, भुसावळ यांसह विविध भागांतील छायाचित्रकारांनी कार्यशाळेत सहभाग नोंदविला. कार्यशाळेसाठी पुणे येथून विशेष मार्गदर्शक म्हणून पंकज देशमुख उपस्थित होते. 'Click Hunt Films'च्या माध्यमातून ते फोटोग्राफी व ड्रोन क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी सहभागी छायाचित्रकारांना छायाचित्र संपादन, व्हिडिओ एडिटिंग, प्रभावी कथाकथन तसेच समाजमाध्यमांवरील कामाची पोहोच वाढविण्याबाबत सखोल मार्गदर्शन केले. कार्यशाळेत फोटोग्राफीमधील आधुनिक तंत्रज्ञान, कॅमेरा हाताळणी, प्रकाशयोजना, छायाचित्राची रचना, योग्य क्षणाची निवड आणि तो प्रभावीपणे कॅमेऱ्यात टिपण्याचे बारकावे समजावून सांगण्यात आले. प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन मिळाल्याने सहभागी छायाचित्रकारांना आधुनिक तंत्रे प्रत्यक्ष समजून घेण्याची संधी मिळाली. 'प्रत्येक सत्रातून नवे शिकणे आणि प्रत्येक छायाचित्रातून स्वतःला अधिक चांगले घडवणे' या उद्देशाने आयोजित या कार्यशाळेमुळे छायाचित्रकारांमध्ये नव्या तंत्रज्ञानाची ओळख निर्माण होण्यासोबतच सर्जनशीलतेला चालना मिळाली. तसेच व्यावसायिक कौशल्यविकासासाठीही या कार्यशाळेने नवी दिशा दिली. ग्रामीण भागातील छायाचित्रकारांना बदलत्या काळातील आधुनिक तंत्रज्ञान आणि ड्रक्माध्यमांची माहिती मिळावी, त्यांच्या कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळावे आणि फोटोग्राफी व्यवसायाला नवी दिशा मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यशाळेच्या आयोजनाचे उपस्थित छायाचित्रकारांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दुर्गेश गोसावी यांनी केले, तर श्याम पाटील यांनी आभार मानले.धरणगाव तालुका ग्रामीण फोटोग्राफर असोसिएशन, पिंप्री खुर्द यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या फोटोग्राफी व व्हिडिओग्राफी कार्यशाळेला छायाचित्रकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अमळनेर, धुळे, शिरपूर, शिंदखेडा, चोपडा, यावल, बऱ्हाणपूर, रावेर, मुक्ताईनगर, धरणगाव, जळगाव, भुसावळ यांसह विविध भागांतील छायाचित्रकारांनी कार्यशाळेत सहभाग नोंदविला. कार्यशाळेसाठी पुणे येथून विशेष मार्गदर्शक म्हणून पंकज देशमुख उपस्थित होते. 'Click Hunt Films'च्या माध्यमातून ते फोटोग्राफी व ड्रक्माध्यम क्षेत्रात कार्यरत आहेत.

धुळ्यात भगवान वराह जयंती उत्साहात साजरी

प्रकाश टॉकीज चौकात विधिवत पूजन, घराघरात जयंती साजरी करण्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स



धुळे । प्रतिनिधी: भगवान विष्णूंचा अवतार मानल्या जाणाऱ्या भगवान वराह यांची जयंती धुळे शहरात उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. श्रीराम सेना फाउंडेशनच्या वतीने पारोळा रोड परिसरातील प्रकाश टॉकीज चौकात भगवान वराह यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून जयंतीनिमित्त धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हिंदू धर्मपरंपरेत भगवान वराह अवताराला विशेष महत्त्व आहे. भगवान विष्णूंनी वराह अवतार धारण करून पृथ्वीचे रक्षण केल्याची धार्मिक मान्यता आहे. त्यामुळे या जयंतीनिमित्त हिंदू बांधवांनी आपल्या घराघरात भगवान वराह जयंती साजरी करून धार्मिक परंपरा आणि संस्कृतीचे जतन करावे, असे आवाहन श्रीराम सेना फाउंडेशनचे संस्थापक विकी गोयर यांनी केले. प्रकाश टॉकीज चौकात आयोजित कार्यक्रमात भगवान वराह यांचे पूजन व आरती करण्यात आली. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी धार्मिक वातावरणात जयंती उत्साहाने साजरी केली. परिसरातील नागरिक आणि हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. याप्रसंगी श्रीराम सेना फाउंडेशनचे संस्थापक विकी गोयर, सामाजिक कार्यकर्ते सागर परदेशी, बापू बागुल, मयूर कुलकर्णी, अविनाश गोयर, काशिनाथ पिंगळे, लोकेश गोयर, कृष्णा अहिरे, रोहित बागुल यांच्यासह शेकडो हिंदुत्ववादी कार्यकर्ते उपस्थित होते. भगवान वराह अवताराचे धार्मिक महत्त्व हिंदू धार्मिक परंपरेनुसार भगवान विष्णूंनी पृथ्वीचे रक्षण करण्यासाठी वराह अवतार धारण केला. त्यामुळे भगवान वराह यांना भगवान विष्णूंच्या प्रमुख अवतारांपैकी एक मानले जाते. वराह जयंतीच्या निमित्ताने धार्मिक श्रद्धा, संस्कृती आणि परंपरांचे स्मरण केले जाते. भगवान विष्णूंचा अवतार मानल्या जाणाऱ्या भगवान वराह यांची जयंती धुळे शहरात उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. श्रीराम सेना फाउंडेशनच्या वतीने पारोळा रोड परिसरातील प्रकाश टॉकीज चौकात भगवान वराह यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून जयंतीनिमित्त धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हिंदू धर्मपरंपरेत भगवान वराह अवताराला विशेष महत्त्व आहे. भगवान विष्णूंनी वराह अवतार धारण करून पृथ्वीचे रक्षण केल्याची धार्मिक मान्यता आहे. त्यामुळे या जयंतीनिमित्त हिंदू बांधवांनी आपल्या घराघरात भगवान वराह जयंती साजरी करून धार्मिक परंपरा आणि संस्कृतीचे जतन करावे, असे आवाहन श्रीराम सेना फाउंडेशनचे संस्थापक विकी गोयर यांनी केले. प्रकाश टॉकीज चौकात आयोजित कार्यक्रमात भगवान वराह यांचे पूजन व आरती करण्यात आली.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

गणेशोत्सवाच्या खरेदीसाठी गांधी पार्क बाजारपेठेत ग्राहकांची झुंबड!

गणरायाच्या स्वागतासाठी सजावटीच्या साहित्याला मोठी मागणी; व्यापाऱ्यांमध्ये उत्साह

जन सम्राट टाईम्स

परभणी ।। प्रतिनिधी: गणेश चतुर्थीचा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने परभणी शहरातील गांधी पार्क परिसरातील बाजारपेठ गणेशोत्सवाच्या खरेदीसाठी गजबजून गेली आहे. गणरायाच्या स्वागतासाठी आवश्यक असलेल्या विविध सजावटीच्या साहित्याच्या खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी होत असून, बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. गांधी पार्क परिसरातील दुकानांमध्ये आकर्षक हार, फुलांच्या माळा, पूजेचे साहित्य, गणेशमूर्ती सजावटीसाठी लागणाऱ्या विविध वस्तू तसेच आकर्षक सजावटीच्या साहित्याची रेलचेल पाहायला मिळत आहे. गणेशोत्सवासाठी घर तसेच सार्वजनिक मंडळांची सजावट करण्यासाठी नागरिकांकडून विविध साहित्याची मोठ्या प्रमाणात खरेदी केली जात आहे. सकाळपासूनच बाजारपेठेत ग्राहकांची वर्दळ वाढत असून, दुपारनंतर आणि सायंकाळच्या वेळेत गर्दीत आणखी वाढ होत असल्याचे चित्र आहे. गणरायाच्या आगमनाची तयारी अंतिम टप्प्यात आल्याने नागरिकांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत वाढलेल्या ग्राहकांच्या गर्दीमुळे व्यापाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. यंदाच्या गणेशोत्सवात सजावटीचे साहित्य, पूजा साहित्य आणि फुलांच्या विक्रीतून चांगली उलाढाल होईल, अशी अपेक्षा व्यापाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.



दरम्यान, बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी होत असल्याने परिसरातील वाहतुकीवरही परिणाम होत आहे. रस्त्याच्या कडेला होणारी वाहनांची पार्किंग आणि ग्राहकांची वाढती वर्दळ यामुळे काही वेळा वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे.

त्यामुळे गणेशोत्सवाच्या दिवसांत गांधी पार्क परिसरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनाने आवश्यक नियोजन करावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. बातमीची चौकट गणरायाच्या स्वागताची जय्यत तयारी! गणेश चतुर्थीच्या पार्श्वभूमीवर गांधी पार्क बाजारपेठेत सजावटीच्या साहित्याला मोठी मागणी असून, ग्राहकांच्या गर्दीने बाजारपेठ फुलून गेली आहे. व्यापाऱ्यांमध्येही यंदाच्या गणेशोत्सवाच्या खरेदीबाबत उत्साहाचे वातावरण आहे. गणेश चतुर्थीचा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने परभणी शहरातील गांधी पार्क परिसरातील बाजारपेठ गणेशोत्सवाच्या खरेदीसाठी गजबजून गेली आहे. गणरायाच्या स्वागतासाठी आवश्यक असलेल्या विविध सजावटीच्या साहित्याच्या खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी होत असून, बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

कासोदा येथे नाभिक समाजाच्या सामाजिक सभागृहाचे भूमिपूजन



जन सम्राट टाईम्स

पारोळा । प्रतिनिधी : एरंडोल तालुक्यातील कासोदा येथे नाभिक समाजाच्या सामाजिक सभागृहाच्या बांधकामाचा भूमिपूजन सोहळा आमदार ॲड. अमोलदादा पाटील यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सामाजिक, सांस्कृतिक व सामूहिक उपक्रमांसाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे, यासाठी नाभिक समाजाकडून अनेक दशकांपासून करण्यात येत असलेली मागणी अखेर मार्गी लागल्याने समाजबांधवांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. नाभिक समाजाच्या विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसह विवाह सोहळे, बैठका, युवक व महिला उपक्रम तसेच सार्वजनिक कार्यक्रमांसाठी स्वतंत्र सभागृहाची आवश्यकता होती. ही गरज लक्षात घेऊन समाजाच्या वतीने सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. अखेर या मागणीला मूर्त स्वरूप मिळाले असून, सभागृहाच्या बांधकामाचा शुभारंभ झाल्याने समाजाच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. यावेळी बोलताना आमदार ॲड. अमोलदादा पाटील म्हणाले की, समाजातील प्रत्येक घटकाला विकासाच्या प्रवाहात समान संधी मिळणे आवश्यक आहे. कोणताही समाज विकासापासून वंचित राहू नये, ही आपली भूमिका असून, स्थानिक गरजा व सामाजिक मागण्यांना प्राधान्य देत विकासकामे मार्गी लावण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. हे सामाजिक सभागृह केवळ एक वास्तू न राहता समाजाच्या एकजुटीचे, सामाजिक उपक्रमांचे आणि पुढील पिढीच्या विकासाचे केंद्र ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. एरंडोल विधानसभा मतदारसंघाच्या विकासाच्या वाटचालीत आमदार आबासाहेब चिमणरावजी पाटील यांचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. त्यांच्या प्रयत्नातून विविध समाजघटकांच्या मूलभूत व सामाजिक गरजा लक्षात घेऊन अनेक विकासकामांना चालना मिळाली. सामाजिक सभागृहे, दफनभूमी व स्मशानभूमींच्या सुधारणा तसेच विविध समाजोपयोगी सुविधांच्या निर्मितीसाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. याच सर्वसमावेशक विकासाच्या विचारांचा वारसा पुढे नेत आमदार ॲड. अमोलदादा पाटील मतदारसंघातील विविध समाजघटकांच्या मागण्यांकडे सकारात्मकतेने पाहत असून, त्या शासनदरबारी मांडून मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. कासोदा येथील नाभिक समाजाच्या सामाजिक सभागृहाचे काम हे त्याच विकासदृष्टीचे उदाहरण असल्याचे समाजबांधवांनी सांगितले. भूमिपूजन सोहळ्याच्या निमित्ताने नाभिक समाजाच्या वतीने आमदार ॲड. अमोलदादा पाटील यांचे आभार मानण्यात आले.

आमदार चंद्रकांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आत्मसन्मान फाउंडेशनमध्ये विविध साहित्याचे वाटप

गरजू घटकांना मदतीचा हात; मनोरुग्णांना मिष्टान्न, पुरुषांना टी-शर्ट तर महिलांना कपड्यांचे वाटप

जन सम्राट टाईम्स

बोदवड । प्रतिनिधी: मुक्ताई विधानसभा मतदारसंघाचे आमदार चंद्रकांत भाऊ पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त बोदवड येथील आत्मसन्मान फाउंडेशनमध्ये रविवारी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. वाढदिवसाचा आनंद केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता गरजू व वंचित घटकांना मदतीचा हात देत सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. या उपक्रमांतर्गत आत्मसन्मान फाउंडेशनमधील मनोरुग्णांना मिष्टान्नाचे वाटप करण्यात आले. तसेच गरजू पुरुषांना टी-शर्ट आणि महिलांना कपड्यांचे वाटप करण्यात आले. साहित्य व मिष्टान्न मिळाल्यानंतर लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंदाचे भाव दिसून आले. आमदार चंद्रकांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या सामाजिक उपक्रमामुळे गरजू घटकांना आधार मिळाला. वाढदिवसाच्या निमित्ताने समाजातील गरजू व्यक्तींच्या गरजा लक्षात घेऊन मदतीचा उपक्रम राबविण्यात आल्याने उपस्थितांनी त्याचे कौतुक केले. ामाजिक बांधिलकी जपणाऱ्या अशा उपक्रमांमुळे समाजातील वंचित घटकांना मानसिक आधार मिळण्यासोबतच त्यांच्याप्रती असलेली संवेदनशीलता आणि माणुसकीची भावना अधिक दृढ होते. वाढदिवसाच्या निमित्ताने करण्यात आलेल्या या उपक्रमातून समाजातील विविध घटकांना आपलेपणाची जाणीव करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या वेळी हर्षराज पाटील, शिवसेना उपजिल्हाप्रमुख छोटू भाऊ भोई, युवा सेना जिल्हाप्रमुख पंकज भाऊ राणे, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक उपाध्यक्ष अफसर खान, व्यापारी संघटना सचिव कैलास भाऊ जावरे, गिरधारी शेठ पणजवानी, महेश शेठ शर्मा, अल्पसंख्यांक कलीम शेख, नगराध्यक्षा मिराबाई दिनेश माळी, उपनगराध्यक्षा रेखा संजय गायकवाड, नगरसेवक निलेश माळी, नगरसेवक सुनील भाऊ बोरसे, नगरसेवक राजेश भाऊ नानवाणी, नगरसेवक हकीम बागवान, नगरसेवक जाफर भाई, भाजपाचे तालुकाध्यक्ष अमोल भाऊ देशमुख, प्रभाकर पाटील, मनोज भाऊ नानवाणी, हरीष भाऊ नानवाणी, गोपाल अग्रवाल, मिलिंद भाऊ बडगुजर, देवा भाऊ खेवलकर, विनोद पाडर, राकेश भाऊ खत्री, युवा सेना तालुकाध्यक्ष अजय भाऊ पाटील यांच्यासह शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार चंद्रकांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या उपक्रमातून 'वाढदिवसाचा आनंद समाजातील गरजू घटकांसोबत वाटून घेणे' हा सामाजिक संदेश देण्यात आला. त्यामुळे या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



साक्री रोडच्या राजाच्या आगमनासाठी धुळ्यात भक्तांची अलोट गर्दी!



जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी: धुळ्यातील साक्री रोडच्या राजाच्या आगमन सोहळ्यानिमित्त शिवतीर्थ चौकात भाविकांची मोठी गर्दी उसळली. फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशांचा गजर आणि 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला. सायंकाळच्या सुमारास शिवतीर्थ चौकातून उत्साहात गणरायाच्या आगमन मिरवणुकीला सुरुवात झाली.

भाजपाचे नगरसेवक प्रदीप बैरागी यांच्या अध्यक्षतेखाली जय श्रीकृष्ण मित्र मंडळाच्या वतीने गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. साक्री रोड भागातील जय श्रीकृष्ण मित्र मंडळाचा गणराया 'साक्री रोडचा राजा' म्हणून उत्तर महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. यंदाही मंडळाने भगवान श्रीकृष्णाच्या रूपातील आकर्षक गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. तब्बल १५ फुटांची भव्य मूर्ती सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. गणरायाच्या आगमनाच्या निमित्ताने शिवतीर्थ चौकात भाविकांची मोठी गर्दी झाली होती. फटाक्यांच्या आतषबाजीने आणि गणरायाच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. मिरवणुकीदरम्यान मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते गणेशगीतांच्या तालावर उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. भक्तिमय वातावरणात निघालेली ही आगमन मिरवणूक रात्री उशिरा साक्री रोड येथे पोहोचून संपन्न झाली. यावेळी जय श्रीकृष्ण मित्र मंडळाचे सदस्य तथा भाजपा नगरसेवक प्रदीप बैरागी, भरत बैरागी, संजय राठोड, राहुल चौधरी, हिमांशू परदेशी, रवींद्र पाटील, करण साळवे, विकी लोंढे, पुनीत पोपली, राज हाके, विशाल बागुल, राहुल नेरकर यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खिचडीच्या विषबाधेत दोन चिमुकल्यांचा दुर्दैवी मृत्यू! चिंचोली लिंबाजीतील थोटे कुटुंबावर काळाचा घाला

जन सम्राट टाईम्स

पारोळा। प्रतिनिधी: छत्रपती संभाजीनगर : कन्नड तालुक्यातील चिंचोली लिंबाजी येथील थोटे कुटुंबावर नियतीने अत्यंत दुर्दैवी आघात केला आहे. रात्री कुटुंबीयांनी एकत्र खाल्लेल्या खिचडीनंतर घरातील चौघांना अचानक उलट्या आणि जुलाबाचा त्रास सुरू झाला. उपचारादरम्यान अवघ्या दोन वर्षांच्या आयुष थोटे आणि त्याची सहा वर्षांची बहीण गायत्री थोटे या दोन्ही चिमुकल्यांचा सलग दोन दिवसांत मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. चिंचोली लिंबाजी येथील रहिवासी नारायण साहेबराव थोटे (३५) यांच्या कुटुंबात पत्नी देवशाला (३०), मुलगी गायत्री आणि मुलगा आयुष असे चौघे सदस्य होते. नेहमीप्रमाणे रात्रीच्या वेळी घरात चुलीवर स्वयंपाक करण्यात आला. कुटुंबीयांनी एकत्र बसून खिचडीचे जेवण केले. मात्र, त्यानंतर काही तासांतच परिस्थितीने गंभीर वळण घेतले. बुधवारी पहाटेपासून नारायण थोटे, त्यांच्या पत्नी देवशाला तसेच



दोन्ही मुलांना अचानक उलट्या आणि जुलाबाचा त्रास सुरू झाला. सुरुवातीला कुटुंबीयांनी स्थानिक पातळीवर प्राथमिक उपचार घेतले. मात्र, प्रकृतीत अपेक्षित सुधारणा न झाल्याने उपचारासाठी पुढील रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, दोन्ही चिमुकल्यांची प्रकृती झपाट्याने खालावली. उपचार सुरू असतानाच दोन वर्षांचा आयुष याचा मृत्यू झाला. या धक्क्यातून कुटुंब सावरत नाही तोच दुसऱ्याच दिवशी सहा वर्षांची गायत्री हिचीही प्राणज्योत मालवली. अवघ्या दोन दिवसांच्या अंतराने पोटच्या दोन्ही मुलांना गमावण्याची वेळ आई-वडिलांवर आली. लहान मुलांच्या हसण्या-खेळण्याने गजबजलेल्या घरात क्षणातच मातम पसरला. दोन चिमुकल्यांच्या मृत्यूमुळे थोटे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, गावकऱ्यांमध्येही हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, खिचडी खाल्ल्यानंतरच कुटुंबातील सर्व सदस्यांना त्रास सुरू झाल्याने अन्नातून विषबाधा झाल्याचा प्राथमिक संशय व्यक्त होत आहे. मात्र, विषबाधेचे नेमके कारण काय होते, याबाबत संबंधित यंत्रणांकडून तपास आणि वैद्यकीय अहवालानंतरच स्पष्टता येणार आहे. या घटनेमुळे ग्रामीण भागात अन्नपदार्थ बनविताना स्वच्छता, साठवणूक आणि अन्नसुरक्षेच्या नियमांचे पालन करण्याचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

धुळे जिल्ह्यातील 14 होतकरू कुस्तीपटूंचा गुणगौरव!

राष्ट्रीय तालीम संघातर्फे रोख बक्षिसांचे वितरण; जिल्हा व राज्यस्तरावर चमकदार कामगिरी

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी: कुस्तीच्या पारंपरिक क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी आणि ग्रामीण तसेच शहरी भागातील होतकरू मल्लांना नवी उमेद देण्यासाठी धुळे जिल्हा राष्ट्रीय तालीम संघाच्या वतीने १४ कुस्तीपटूंचा मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला. विशेष प्राविण्य मिळवून जिल्हा तसेच राज्यस्तरावर कुस्तीचे मैदान गाजविणाऱ्या या मल्लांना यावेळी रोख बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. धुळे शहरातील विविध व्यायामशाळांमध्ये सराव करणाऱ्या कुस्तीपटूंनी अलिकडच्या काळात विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या मेहनतीची दखल घेत त्यांना प्रोत्साहन मिळावे, भविष्यात राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करण्यासाठी प्रेरणा मिळावी, या उद्देशाने तालीम संघाच्या वतीने हा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये विशेष कामगिरी करणाऱ्या १४ मल्लांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कुस्तीपटूंना



त्यांच्या कामगिरीनुसार ५ हजार रुपयांपासून ते ३१ हजार रुपयांपर्यंत रोख बक्षिसांचे वितरण करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते झालेल्या या सन्मानामुळे कुस्तीपटूंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांनी तालीम संघाचे आभार मानले. कुस्ती हा महाराष्ट्राच्या मातीत रुजलेला पारंपरिक खेळ असून, या खेळाला आधुनिक काळातही नवी उंची मिळवून देण्यासाठी मल्लांना सातत्याने प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. मेहनत, शिस्त, सातत्य आणि जिद्द यांच्या जोरावर कुस्तीपटू विविध स्तरांवर यश संपादन करत आहेत. अशा खेळाडूंचा गौरव केल्याने त्यांचा आत्मविश्वास वाढण्यासोबतच नवोदित मल्लांनाही प्रेरणा मिळते, असा सूर यावेळी व्यक्त करण्यात आला. या गुणगौरव सोहळ्यास आमदार अनुप अग्रवाल, माजी आमदार राजवर्धन कदम बांडे, रावसाहेब गिरासे, धुळे जिल्हा राष्ट्रीय तालीम संघाचे रवींद्र आघाव, सुनील महाले, उद्योजक संजय अग्रवाल, सतीश अंबळकर, दत्तात्रय कल्याणकर, सचिन शेवतकर, चंद्रकांत सैंदाणे यांच्यासह कुस्ती क्षेत्रातील पदाधिकारी, प्रशिक्षक, व्यायामशाळांचे प्रतिनिधी, खेळाडू आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमातून धुळे जिल्ह्यातील कुस्तीला प्रोत्साहन देण्याचा आणि नवोदित मल्लांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा तालीम संघाचा प्रयत्न अधोरेखित झाला. रोख बक्षिसांच्या माध्यमातून खेळाडूंच्या मेहनतीचा सन्मान होत असल्याने आगामी काळात आणखी मल्लांनी कुस्ती क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.



सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची ।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ॥
सर्वांगी सुंदर उटि शेंदुराची ।
कंठी झळके माळ मुक्ताफळांची ॥१॥
जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।
दर्शनमात्रे मनकामना पुरती ॥ध्रु०॥

रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा ।
चंदनाची उटी कुंकुमकेशरा ॥
हिरेजडीत मुकुट शोभतो बरा ।
रुणझुणती नूपरें चरणीं घागरिया ॥२॥
॥ जय देव जय देव०॥

माथा मुकुट मणी कानी कुंडले ।
सोंड दोंदावरी शेंदुर चर्चिले ।।
नागबंद सोंड-दोंद मिरविले ।
विश्वरूप तया मोरयाचे देखिले ॥३॥
॥ जय देव जय देव०॥

चतुर्भुज गणराज बाही बाहुटे ।
खाजयाचे लाडू करुनी गोमटे ।।
सुवर्णाचे ताटी शर्करा घृत ।
अर्पी तो गणराज विघ्ने वारीतो ॥४॥
॥ जय देव जय देव०॥

छत्रे चामरे तुजला मिरविती ।
उंदीराचे वाहन तुजला गणपती ।।
ऐसा तु कलीयुगी सकळीक पाहसी ।
आनंदे भक्तासी प्रसन्न होसी ॥५॥
॥ जय देव जय देव०॥

ता ता धि मि किट धि मि किट नाचे गणपती ।
ईश्वर पार्वती कौतुक पाहती ।।
ताल मृदंग वीणा घोर उमटती ।
त्यांचे छंदे करुनी नाचे गणपती ॥६॥
॥ जय देव जय देव०॥

लंबोदर पीतांबर फणिवरबंधना ।
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ॥
दास रामाचा वाट पाहे सदना ।
संकटीं पावावें निर्वाणीं
रक्षावें सुरवर वंदना ॥ ७ ॥

जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।
दर्शनमात्रे मनकामना पुरती ॥
जय देव जय देव०॥

शेंदुर लाल चढ़ायो आरती

शेंदुर लाल चढ़ायो अच्छा गजमुखको।
दोंदिल लाल बिराजे सुत गौरिहरको।
हाथ लिए गुडलद्दु सांई सुरवरको।
महिमा कहे न जाय लागत हूं पादको ॥1॥

जय जय श्री गणराज विद्या सुखदाता
धन्य तुम्हारा दर्शन मेरा मन रमता,
जय देव जय देव ॥ध्रु०॥

अष्टौ सिद्धि दासी संकटको बैरि ।
विघ्नविनाशन मंगल मूरत अधिकारी ।
कोटीसूरजप्रकाश ऐबी छबि तेरी ।
गंडस्थलमदमस्तक झूले शशिबिहारि ॥२॥

॥ जय देव जय देव०॥

भावभगत से कोई शरणागत आवे ।
संतत संपत सबही भरपूर पावे ।
ऐसे तुम महाराज मोको अति भावे ।
गोसावीनंदन निशिदिन गुन गावे ॥३॥

॥ जय देव जय देव०॥



गणेश चतुर्थी आरती संग्रह

जय गणेश जय गणेश देवा आरती

जय गणेश, जय गणेश, जय गणेश देवा।
माता जाकी पार्वती, पिता महादेवा ॥

एकदंत, दयावन्त, चार भुजाधारी,
माथे सिन्दूर सोहे, मूस की सवारी ।
पान चढ़े, फूल चढ़े और चढ़े मेवा,
लड्डुअन का भोग लगे, सन्त करें सेवा ॥

जय गणेश, जय गणेश,
जय गणेश, देवा ।
माता जाकी पार्वती,
पिता महादेवा ॥

अंधन को आंख देत,
कोढ़िन को काया,
बांझन को पुत्र देत,
निर्धन को माया।
'सूर' श्याम शरण आए,
सफल कीजे सेवा ॥

जय गणेश जय गणेश
जय गणेश देवा ।
माता जाकी पार्वती,
पिता महादेवा ॥

दीनन की लाज रखो,
शंभु सुतकारी।
कामना को पूर्ण करो
जय बलिहारी।

घालीन लोटांगण वंदीन चरण ।
डोळ्यांनी पाहिन रूप तुझे ।
प्रेमें आलिंगीन आनंद पूजन ।
भावे ओवाळिन म्हणे नामा ।।
त्वमेव माता पिता त्वमेव ।
त्वमेव बन्धुः सखा त्वमेव ।

त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव ।
त्वमेव सर्वं मम देवदेव ।।
कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा ।
बुध्यात्मना वा प्रकृति स्वभावात् ।
करमि यद्यत् सकलं परस्मै ।
नारायणायेती समर्पयामि ।।

अच्युतं केशवं राम नारायणम्
कृष्णदामोदरं वासुदेवं भजे।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभम्
जानकीनायकं रामचंद्र भजे ।।
हरे राम हरे राम राम राम हरे हरे
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।।